सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
मालवणी पोलीस ठाणे,
गेट नं. ०५, अब्दुल हमीद रोड, मालाड (प), मुंबई
दूरध्वनी क्र. ०२२-२८८२७५५७/२८८१३१९
**Email :** ps.malvani.mum@mahapolice.gov.in

## मालवणी पोलीस ठाणे कडून Commercial Quantity इतका एकुण २६३ ग्रॅम ''हेरॉईन'' (गर्द पावडर) (आंतरराष्ट्रीय अं.किं. ७८,९०,०००/- रू) हस्तगत केले बाबत.

**" PRESS NOTE "**

दिनांक १४/०८/२०२६ रोजी २०.०० वा. चे सुमारास शांती वेल्फेअर सोसायटी, लक्ष्मी नगर, अली तलाव रोड, खारोडी, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई या ठिकाणी एक इसम वय ३४ वर्षे याने एकुण ४.९० ग्रॅम ''हेरॉईन'' (गर्द पावडर) (आंतरराष्ट्रीय अं.किं. १,५०,०००/- रू) हा अंमली पदार्थ विक्री करण्याचे उद्देशाने स्वत: चे कब्जात बाळगताना मिळुन आला. म्हणुन त्याचे विरोधात मालवणी पोलीस ठाणे गु.र.क्र. १३६१/२०२६ कलम ८(क) सह कलम २१(अ) एन.डी. पी.एस. कायदा १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयातील आरोपीत इसमाने गुन्हयाच्या तपासा दरम्यान सदरचा ''हेरॉईन'' (गर्द पावडर) हा त्याने नालासोपारा येथुन आणल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. आरोपीताने दिलेली माहिती आणि गुप्त माहितीदार यांच्याकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे गोल्डन अपार्टमेंट, वाघेश्वरी, नालासोपारा पश्चिम, जिल्हा पालघर या ठिकाणी संशयीत इसम वय १९ वर्षे रा.ठि. उत्तरप्रदेश याच्याकडुन एकुण २६३ ग्रॅम ''हेरॉईन'' (गर्द पावडर) (आंतरराष्ट्रीय अं.किं. ७८,९०,०००/- रू) हस्तगत करून त्यास सदरच्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच सदरचा ''हेरॉईन'' (गर्द पावडर) हा अटक आरोपीताने पाहिजे आरोपीत इसम रा.ठि. सिगरोड गाव, जिल्हा-हरिव्दार, राज्य-उत्तराखंड याच्या कडुन आणला असल्याचे तपासात सांगितले असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.) डॉ. श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, श्री. शशिकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर, परिमंडळ ०२, श्री. संदिप घुगे, मा. सपोआ मालवणी विभाग, श्री. महेशकुमार ठाकुर, वपोनि राणी पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मिना मरे, पोउनि प्रदिप लोंढे, पोहक्र. ०४०१९३/रब्बिल शेख, पोशिक्र. १४००५३/साजिद शेख, पोशिक्र. १४००८५/मुद्दस्सर देसाई, पोशिक्र. १४१५६८/कालिदास खुडे, पोशिक्र. १४२६१३/दत्तात्रय गावडे, पोशिक्र. १४०६६०/सुमित सोरटे, पोशिक्र. १०००१४/आदित्य राणे (तांत्रीक मदत) यांनी केली आहे.

****************************************